# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.


Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२१ फेब्रुवारी, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

## वाहतुक अधिसुचना

चंद्रपूर ते गडचांदूर भोयेगांव मार्गे जाणाऱ्या रस्त्यावरील वर्धा नदिच्या पुलाचे काम करणे असल्याने व सदरचे काम संपूर्ण वाहतुक बंद केल्याखेरीज करणे शक्य नसल्याने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग—१, चंद्रपूर यांनी सदर रस्त्याची वाहतुक बंद करुन पर्यायी रस्त्याने वळविण्याबाबत विनंती केली असुन मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी वाहतुक वळती करण्याबाबत परवानगी दिली आहे. जनतेला त्रास व असुविधा होवु नये तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये याकरीता धानोरा— भोयेगांव मार्गे गडचांदूर रस्ता बंद करुन पर्यायी मार्ग निश्चित करणे आवश्यक आहे.

प्रभारी पोलीस अधीक्षक तथा अपर पोलीस अधीक्षक चंद्रपुर महाराष्ट्र पोलीस अधिनियम—१९५१ च्या कलम—३३(१)(ब) अन्वये जनतेला धोका, अडथळा किंवा गैरसोय होवु नये तसेच कोणत्याही प्रकारचा अपघात होवु नये व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये याकरीता राज्य मार्ग क्रमांक ३७३ चंद्रपूर ते गडचांदूर भोयेगांव मार्गे जाणाऱ्या रस्त्यावरील वर्धा नदिच्या पुलाचे काम करणे असल्याने व मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी परवानगी दिली असल्याने सदरचा रस्ता दि. २३/०२/२०२० पासुन ३० दिवसांकरीता सर्व प्रकारच्या वाहनांना रहदारीस बंद करण्यात येत असुन वाहतुक दारांनी खालील पर्यायी मार्गाचा वापर करावा असे जनतेला निर्देश देत आहे.

१. **गडचांदूर ते वणी—** गडचांदूर वनसडी—कोरपणा—कुरई— आबई फाटा— चारगांव चौकी ते वणी.
२. **गडचांदूर ते घूग्घूस—** गडचांदूर— सांगोडा फाटा— गाडेगांव—विरुर—मुंगोली— नकोडा ते घुग्घूस.
३. **गडचांदूर— चंद्रपूर— अ)** गडचांदूर—खामोना—गौरी— पवनी—कडोली— हडस्ती— आरवट— दाताळा ते चंद्रपूर (हलकी वाहने).
   **ब)** गडचांदूर—राजुरा—बल्लारशा— चंद्रपूर (सर्व वाहनांकरीता).

**सदर अधिसूचना दि. २३/०२/२०२० पासुन ३० दिवसांपर्यंत अंमलात राहील.** वरिल निर्देशांचे पालन करुन प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

---

# बल्लारशाह पोलीसांची विशेष कार्यवाही
## ०३ आरोपीतांकडुन चोरी घरफोडीचे तिन गुन्हे उघडकीस

दिनांक ०७/०१/२०२० रोजी फिर्यादी नामे लहानु पाझारे रा. जाकीर हुसेन वार्ड बल्लारशाह यांनी पोलीस स्टेशन बल्लारशाह येथे रिपोर्ट दिली की, कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे घरात प्रवेश करून त्यांचे घरातील सोने चांदीचे दागीने व इतर साहित्य असा एकुण २७,०००/—रू चा मुदद्ेमाल चोरून नेला. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन बल्लारशाह येथे अप.क्र. २६/२०२० कलम ४५४,४५७,३८० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा नोंद होताच वरिष्ठ अधिकारी यांचे मार्गदर्शनात सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शोध पथक बल्लारशाह यांचे कडे सोपाविण्यात आला. गुन्हे शोध पथकाने लागलीच तपासास सुरूवात केली. तांत्रीक बांबीवर आणि गोपनीय माहिती काढुन गुन्हे शोध पथकाने वेगवेगळया पदधतीने माहिती गोळा करण्यास सुरूवात केली. दरम्यान गोपनीय माहितीवरून मौलाना आझाद वार्ड येथील तिन इसमांना ताब्यात घेण्यात आले. सदर इसमांना गुन्हयाबाबत विचारपुस केली असता, त्यांनी कबुली दिली की, दिनांक ०७/०१/२०२० रोजी त्यांनीच वरील नमुद फिर्यादी यांचे घरी चोरी केली होती. यावरून सदर आरोपी नामे १) दिपक उर्फ गब्बर रामप्रकाश निषाद वय २८, २) दर्शन उर्फ बापु अशोक तेलंग वय २०, ३) आकाश उर्फ प्रिन्स रवि गोगुर्ले वय १९ सर्व रा. मौलाना आझाद वार्ड बल्लारशाह यांना अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीतांचा मा. न्यायालयातुन पोलीस कोठडी रिमांड घेवुन आरोपीतांची इतर गुन्हयाबाबत सखोल चौकशी केली असता, सदर तिन्ही आरोपीतांनी यापुर्वीही दोन गुन्हे केल्याची कबुली दिल्याने आरोपीतांकडुन तिन्ही गुन्हयात चोरीस गेलेला ३८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने किं. १,५५,६००/—रू आणि ५ मोबाईल फोन किं. २५,०००/—रू असा एकुण १,८०,६००/—रू चा मुदद्ेमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही श्री. प्रशांत खैरे, प्रभारी पोलीस अधीक्षक चंद्रपुर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राजुरा श्री. स्वप्नील जाधव यांचे मार्गदर्शनात पोलीस निरिक्षक श्री. शिवलाल भगत, यांचे नेतृत्वात सपोनि. श्री. विकास गायकवाड, पोहवा. सुनिल कांबळे, पोना. संतोष दंडेवार, सुधाकर वरघने, पोशि. शेखर मातनकर, शरद कुडे, श्रीनीवास वाबीटकर, स्वप्नील दरेकर यांनी महत्वाची भुमिका बजाविली.

———————————————————————————————